महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

पी.आर-३/सबसिडी/ No 13982 दिनांक : 16 JUN 2017

**वाणिज्य परिपत्रक क्र.** 289

**विषय:** विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांच्या वीज दराच्या सवलतीबाबत सुधारित आदेश.

**संदर्भ:** १) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.२९.०६.२०१६.
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.२४.०३.२०१७.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांच्या वीज दरात सवलत देण्याबाबत उपरोक्त दि.२९.०६.२०१६ रोजी शासन आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदर आदेशानुसार संबंधित औद्योगिक ग्राहकांना देण्यात येणा-या वीज दरात सवलतीचा आढावा मंत्रीमंडळ उपसमितीने घेतला. तसेच दरम्यानच्या काळात मा. विद्युत नियामक आयोगाने त्यांच्या दि. ०३.११.२०१६ च्या आदेशान्वये दि.०१.११.२०१६ पासून नवीन वीज दर लागू केले आहेत. त्यामुळे औद्योगिक ग्राहकांना देण्यात येणा-या वीज दर सवलतीचा पुन्हा आढावा घेऊन त्या अनुषंगाने सुधारित आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत मंत्रीमंडळ उपसमितीच्या दि.१८.०१.२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

१) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांच्या वीज दरात सवलत देण्याबाबत शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.२९.०६.२०१६ अन्वये निर्गमित केलेल्या शासन आदेशाची अंमलबजावणी दि.०१.०४.२०१६ पासून करण्यात येईल. त्यामुळे दि.०१.०४.२०१६ ते दि.२८.०६.२०१६ या कालावधीतील संबंधित ग्राहकांच्या वीज दर सवलतीच्या रक्कमेचे समायोजन पुढील तीन मासिक हप्त्यांमध्ये करण्यात येईल.

२) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांच्या वीज दरात सवलत देण्याबाबतच्या दि.२९.०६.२०१६ च्या शासन निर्णयातील (अ) इंधन समायोजन आकार, (ब) उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित सवलत या दोन्ही सवलती मिळून विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील कार्यरत औद्योगिक ग्राहकांच्या परिणामी नवीन वीज दर रु. ४.०० प्रति युनीट पेक्षा कमी नसावा. सदर वीज दर सवलती व्यतिरिक्त संदर्भिय शासन निर्णय क्र.१ मधील (क) येथे नमूद केल्याप्रमाणे नवीन उद्योगांकरीता प्रोत्साहनपर अतिरिक्त वीज दरातील सवलत (रु.०.७५/०.५०प्रति युनीट) देय राहिल. या अटींची अंमलबजावणी दि.०१.०४.२०१६ पासून करण्यात येईल. रु.४.०० प्रति युनीटपेक्षा कमी परिणामी वीज दर झालेल्या रक्कमेचे ग्राहकाच्या पुढील वीज बिलामध्ये समायोजन करण्यात येईल.

३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक ०३.११.२०१६ च्या वीजदर आदेशानुसार महावितरण कंपनीच्या ग्राहकांना दि.०१.११.२०१६ पासून नवीन वीज दर आकारण्यात येत आहेत. या वीज दर आदेशानुसार विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना दि.०१.११.२०१६ पासून खालील तक्याप्रमाणे वीज दरात सवलत अनुज्ञेय राहिल.

| **इंधन समायोजन आकार सवलत (पैसे / युनीट)** | |
|---|---|
| विदर्भ | ४० |
| मराठवाडा | ३० |
| उत्तर महाराष्ट्र | २० |
| **नवीन उद्योगांसाठी अतिरिक्त सवलत (पैसे / युनीट)** | |
| विदर्भ व मराठवाडयाकरीता | ७५ |
| उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्राकरीता | ५० |

| उच्चदाब ग्राहक | कार्यक्षमता २६ % पर्यंतची श्रेणी | विदर्भ पैसे/युनिट | मराठवाडा पैसे/युनिट | उत्तर महाराष्ट्र पैसे/ युनिट | D,D+ झोन पैसे/युनिट |
|---|---|---|---|---|---|
| ६६ केव्हीवरील | ०-५ % | ३० | २५ | १० | ५ |
| | >५%-१०% | ७० | ६५ | १५ | १० |
| | >१०%-१५% | ९० | ८० | १५ | १५ |
| | >१५%-२०% | १५२ | १०० | २५ | २० |
| | >२०% | १४० | १०० | २५ | २० |
| ३३ केव्हीवरील | ०-५ % | ३० | २५ | १० | ५ |
| | >५%-१०% | ७० | ६५ | १५ | १० |
| | >१०%-१५% | ९० | ८० | १५ | १५ |
| | >१५%-२०% | १५२ | १०० | २५ | २० |
| | >२०% | १४० | १०० | २५ | २० |
| २२/११ केव्हीवरील | ०-५ % | ६५ | ६० | ४५ | ४० |
| | >५%-१०% | १०२ | ९७ | ४७ | ४२ |
| | >१०%-१५% | ११८ | १०८ | ४३ | ४३ |
| | >१५%-२०% | १७६ | १२४ | ४९ | ४४ |
| | >२०% | १६० | १०७ | ४५ | ४० |
| लघुदाब ग्राहक | ०-५ % | ६५ | ५५ | २५ | १५ |
| | >=५% | ९५ | ८५ | ४५ | ३० |

४) फक्त अपारंपारिक स्वविज ऊर्जा प्रकल्प, सहवीज (Co-generation) निर्मिती प्रकल्प व एम्बेडेड पारंपारिक स्वविज निर्मिती प्रकल्पातून निर्माण होणारी वीज जी संपूर्णपणे स्वत:करीता वापरतात (१००% captive users) असे औद्योगिक ग्राहक ज्या प्रमाणात महावितरणकडून वीज घेतील अशा औद्योगिक ग्राहकांना दि.२९.०६.२०१६ च्या शासन निर्णयातील व दि.०१.११.२०१६ पासून दि.२४.०३.२०१७ च्या शासन निर्णयातील सुधारित सवलतीचे दर त्या प्रमाणात लागू राहतील. वरील तिन्ही प्रकारच्या वीज निर्मिती प्रकल्पांचे पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) महाराष्ट्र शासनाच्या मुख्य विद्युत निरिक्षकांनी दिल्यानंतर सदर सवलत अनुज्ञेय राहिल. इतर स्ववीज निर्मिती प्रकल्प व स्वविज गट प्रकल्प (Group Captive Users) ग्राहकांना या योजने अंतर्गत वीज दर सवलत अनुज्ञेय असणार नाही. ही सवलत प्रति ग्राहक रु.५० लाख प्रति महिना या पेक्षा जास्त असणार नाही.

स्ववीज ऊर्जा प्रकल्पातून वीज वापरणा-या ग्राहकांना, तो ग्राहक ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्रातील विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ शासन निर्णयानुसार सवलतीचा दर महावितरण कंपनीच्या वीज वापरावर लागू राहील.

५) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील एखादा औद्योगिक ग्राहक ओपन ॲक्सेस मधून परत महावितरण कंपनीकडे आल्यास त्याला नवीन ग्राहक किंवा नवीन औद्योगिक ग्राहक म्हणून समजण्यात येणार नाही.

६) नवीन उद्योगांना देण्यात येणारी सवलत ही महावितरण कंपनीकडे सदरील उद्योग दि.०१.०४.२०१६ नंतर आल्यास नवीन उद्योगांची सवलत चालू आहे व पुढेही चालू राहील. सदर शासन निर्णयामध्ये दि.०१.०४.२०१६ नंतर नवीन उद्योग उभारल्यास किंवा कार्यरत उद्योगाने त्याच्याकडील उपलब्ध जागेत नवीन उद्योग दि.०१.०४.२०१६ नंतर उभारल्यास किंवा सुरु केल्यास किंवा वीज क्षमतावृध्दी केल्यास / उत्पादनात वाढ केल्यास सदर सवलत लागू राहील. याबाबतीत शासनाकडून स्पष्टीकरण मागितले असून ते प्राप्त झाल्यानंतरच दि.२४.०३.२०१७ रोजीच्या शासन आदेशाची अंमलबजावणी करण्यात येईल व सदर सवलतीचा लाभ देण्यात येईल.

स्ववीज ऊर्जा प्रकल्पातून वीज वापरणा-या ग्राहकांना, तो ग्राहक ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्रातील विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ शासन निर्णयानुसार सवलतीचा दर महावितरण कंपनीच्या वीज वापरावर लागू राहील.

७) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील सध्याच्या कार्यरत उच्चदाब यंत्रमाग ग्राहकांना उपरोक्त दि.२९.०६.२०१६ च्या शासन निर्णयातील व दि.०१.११.२०१६ पासून सुधारित वीज दरानुसार सवलती लागू राहतील.

तसेच लघुदाब यंत्रमागधारक ग्राहकांना दि.०७.११.२०१५ व दि.०३.१२.२०१५ या शासन निर्णयानुसार सवलती लागू राहतील.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

हे परिपत्रक, महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

(शंकर द. शिंदे) 6/6

**कार्यकारी संचालक (वितरण-२)**

**प्रत माहितीस सविनय सादरः**

मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)

--- वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने उच्चदाब व लघुदाब औद्योगिक ग्राहकांच्या देयकाच्या संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत व या योजने अतंर्गत लाभ देण्यात येणाऱ्या औद्योगिक ग्राहकांना संपूर्ण तपशिल उदा. ग्राहकाचे नांव, वर्गवारी, दरमहा वापर, त्यावर अनुज्ञेय असलेली सवलत व प्रत्यक्षात देय सवलतीची रक्कम याबाबत स्वतंत्र अभिलेख ठेवावा जेणेकरुन शासनाकडून अनुदानाची मागणी करण्यात येईल. सुधारीत शासन निर्णय दि.२४.०३.२०१७ मधील शा.नि.अ.क्र.२ नुसार सवलतीचा एकूण परिणामी वीज दर रु.४.०० प्रति युनीट पेक्षा कमी नसावा. शा.नि.अ.क्र. ४ नुसार सवलत प्रति ग्राहक रु.५० लाख प्रति महिना यापेक्षा जास्त नसावा व सदर मर्यादेबाबतची तरतूद माहिती तंत्रज्ञान प्रणालीमध्ये करण्यात यावी.

तसेच, शा.नि.अ.क्र. ४ नुसार महाराष्ट्र शासनाच्या मुख्य विद्युत निरिक्षकांनी दिलेले पात्रता प्रमाणपत्र ( Eligibility Certificate) अपलोड करण्याबाबतची तरतूद माहिती तंत्रज्ञान प्रणालीमध्ये करण्यात यावी.

**प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे.**